सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, नवी मुंबई**
मुंबई व कोकण विभाग ,तिसरा मजला, कोकण भवन,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबइ-४००६१४.

दूरध्वनी क्र. ०२२-२७५७३५४२ संकेतस्थळ : https://directorate.marathi.gov.in ईमेल- bhasha.adhikari@gmail.com

क्र.मलप२०२५/प्र.क्र.१४०/१७८
दिनांक : ८/१०/२०२५

संबंधित कार्यालये

विषय :- भाषा संचालनालामार्फत घेण्यात येणारी मराठी लघुलेखन परीक्षा- आक्टोबर, २०२५ परीक्षेची कार्यक्रमपत्रिका, आसन क्रमांक व वेळापत्रक इत्यादीची माहिती संबंधित कार्यालयांना पाठवण्याबाबत.

महोदय,

भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी ८० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी लघुलेखन परीक्षा **शुक्रवार दि.१७ ऑक्टोबर, २०२५** रोजी मुंबई केंद्रावर सकाळी ठीक १०.३० वाजल्यापासून घेण्यात येणार आहे. या परीक्षेचे केंद्र, परीक्षाचालक-नि-ज्येष्ठ पर्यवेक्षकाचे नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक व परीक्षेचे वेळापत्रक तसेच परीक्षेला बसणाऱ्या परीक्षार्थ्यांसाठी सूचना इत्यादी माहिती पुढील कार्यवाहीसाठी सोबत पाठवण्यात येत आहे.

२. आपल्या कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्यांना या परीक्षेस प्रवेश दिलेला आहे त्यांची नावे, आसन क्रमांक व परीक्षेचे वेळापत्रक यासंबंधीची माहिती सोबत जोडली आहे. आपल्या कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या परीक्षेचा दिनांक, आसन क्रमांक, वेळापत्रक याबाबतची अचूक माहिती तात्काळ देण्याची कृपया व्यवस्था करावी व सदर माहिती मिळाल्याबद्दल संबंधितांची स्वाक्षरी घ्यावी. परीक्षेचे वेळापत्रक परीक्षेपूर्वी किमान दोन दिवस अगोदर परीक्षा केंद्रावर लावण्याबद्दल संबंधित परीक्षाचालकांना यापूर्वीच सूचना देण्यात आल्या आहेत. आपल्या कार्यालयातील एखाद्या कर्मचाऱ्याची दरम्यानच्या काळात अन्य ठिकाणी बदली झाली असेल अगर एखादा कर्मचारी रजेवर गेला असेल तर, परीक्षेची सर्व माहिती त्याला परीक्षेपूर्वी कळविण्याची व्यवस्था तात्काळ करावी व तसे केल्याचे या कार्यालयास उलटटपाली कळवावे.

३. या परीक्षेस बसणाऱ्या परीक्षार्थ्यांना निश्चितपणे ओळखता यावे म्हणून ओळखपत्राचा नमुना सोबत पाठविण्यात येत आहे. सदर ओळखपत्र संबंधित कर्मचाऱ्याकडून भरुन घ्यावे व त्यावर आपल्या समक्ष त्यांची स्वाक्षरी घ्यावी. ओळखपत्रावर आपण अगर आपल्या हाताखालील एखाद्या जबाबदार अधिकाऱ्याने (असा अधिकारी राजपत्रित असावा) स्वाक्षरी करणे जरुरीचे आहे. सदर ओळखपत्र तसेच कार्यालयाने त्यांना दिलेले फोटो असलेले त्यांचे ओळखपत्रही (आयकार्ड) परीक्षाचालकांनी मागणी करताच त्यांनी दाखवणे आवश्यक आहे. ज्या परीक्षार्थ्यांकडे त्यांचे छायाचित्र (फोटो) असलेले कार्यालयाने दिलेले ओळखपत्र नसेल त्याने परीक्षेच्या ओळखपत्रावर फोटो चिकटवून तो कार्यालय प्रमुखांमार्फत साक्षांकित करुन घेणे आवश्यक आहे. फोटो असलेले ओळखपत्र नसल्यास अगर त्याने परीक्षेच्या ओळखपत्रावर फोटो चिकटवून तो साक्षांकित करुन घेतला नसल्यास त्यांना परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही याची संबंधित कर्मचाऱ्यांना जाणीव करुन द्यावी.

४. आपल्या कार्यालयातील परीक्षेस बसणाऱ्या एखाद्या कर्मचाऱ्याचे नाव त्याचे आवेदनपत्र विहित मुदतीत या कार्यालयाकडे पाठवूनही त्याला प्रवेश दिलेला नसेल तर अशा कर्मचाऱ्यास संबंधित परीक्षाचालकांना परीक्षा केंद्रावर भेटण्यासंबंधी सूचना

द्याव्यात. एखाद्या परीक्षार्थ्याच्या नावात, कार्यालयाच्या पत्त्यात अगर यादीत काही त्रुटी आढळून आल्यास त्याबाबत परीक्षेपूर्वी या कार्यालयास तसे लेखी कळवावे.

५. आपल्या कार्यालयामार्फत नामनिर्देशित उमेदवारांस परीक्षेस उपस्थित राहण्याची सूचना द्यावी. पूर्व अनुमती न घेता परीक्षेला अनुपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्याची त्या दिवसाची रजा विनावेतन करण्यात यावी.

६. परीक्षेस बसणाऱ्या परीक्षार्थ्यांना परीक्षा प्रत्यक्ष सुरू होण्यापूर्वी १५ (पंधरा) मिनिटे अगोदर परीक्षा दालनात प्रवेश देण्यात येईल. चाचणी दाखल एखाद्या उताऱ्याचे श्रुतलेखनही देण्यात येईल व त्याकरता कर्मचाऱ्यांनी परीक्षेच्या वेळेपूर्वी १५ मिनिटे तरी परीक्षा दालनात उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच परीक्षा सुरु झाल्यावर किमान अर्धा तास तरी त्याला परीक्षा दालन सोडता येणार नाही.

७. भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी मराठी लघुलेखनाची फक्त ८० शब्द प्रति मिनिट गतीची परीक्षा घेण्यात येते. या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५० गुण मिळवावे लागतात. मराठी लघुलेखन परीक्षेच्या गुणांकन पध्दतीच्या माहितीची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे. ती परीक्षेस बसणाऱ्या कर्मचाऱ्यांना कृपया द्यावी. **तसेच मराठी लघुलेखन परीक्षेच्या परीक्षार्थ्यांनी श्रुतलेखन संकेताकृतीमध्येच घेणे आवश्यक आहे. देवनागरी लिपीमध्ये मजकूर स्वरूपात श्रुतलेखन घेतल्यास संबंधित परीक्षार्थ्यांची उत्तरपत्रिका तपासली जाणार नाही अशा सूचना कृपया संबंधित परीक्षार्थ्यांना द्याव्यात व त्याबाबत त्यांची स्वाक्षरी घ्यावी.**

८. भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी मराठी लघुलेखन परीक्षा ही शासनातर्फे घेण्यात येणाऱ्या विभागीय परीक्षेसारखी असल्याने या परीक्षेला उपस्थित राहिलेल्या उमेदवारांचा परीक्षेचा कालावधी हा दोन संधी पुरता कर्तव्यार्थ समजावा. या परीक्षेसाठी त्यांना प्रवास करावा लागल्यास नियमानुसार पहिल्या दोन संधीसाठी त्यांना प्रवास खर्च अनुज्ञेय राहील.

कृपया या पत्रास सर्वप्राधान्य द्यावे व पत्राची पोच द्यावी ही विनंती.

आपली,

(स्वाक्षरी)

**सहायक भाषा संचालक,**
**भाषा संचालनालय,मुंबई व कोकण विभाग,**
**नवी मुंबई.**

**सहपत्रे :**

१. परीक्षाचालक-नि-ज्येष्ठ पर्यवेक्षकाचे नाव, दूरध्वनी क्रमांक, केंद्राचा पत्ता व वेळापत्रक इत्यादीची माहिती दर्शविणारे विवरणपत्र.
२. उमेदवारांची यादी.
३. ओळखपत्राचा नमुना.
४. मराठी लघुलेखन परीक्षेच्या गुणांकन पध्दतीच्या माहितीची प्रत.

**प्रत माहितीकरिता व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी- ८० शब्द प्रति मिनिट गतीची**

**मराठी लघुलेखन परीक्षा — ऑक्टोबर, २०२५**

**परीक्षेचे वेळापत्रक**

**परीक्षेचा दिनांक : शुक्रवार १७ ऑक्टोबर, २०२५**
**परीक्षेची वेळ : सकाळी १०.३० वाजल्यापासून पुढे**

परीक्षाचालक-नि-ज्येष्ठ पर्यवेक्षकाचे नाव, दूरध्वनी क्रमांक, परीक्षा केंद्राचा पत्ता इत्यादींची माहिती दर्शविणारे विवरणपत्र

| अ.क्र. | केंद्र | **परीक्षा केंद्राचा पूर्ण पत्ता** | **परीक्षाचालकज्येष्ठ -नि- पर्यवेक्षकाचे नाव व कार्यालयाचा पत्ता दूरध्वनी क्रमांक** | आसन क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | मुंबई | मा.आयुक्त,कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, तिसरा मजला,रूम नं.३२६ (मिटींग हॉल), कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ | श्रीमती आ.अ.वेलिंग, सहायक भाषा संचालक, भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,मुंबई व कोकण विभाग, कोकण भवन, तिसरा मजला, नवी मुंबई-४००६१४ **दूरध्वनी** क्र.०२२-२७५७३५४२ भ्रमणध्वनी क्र. ९८६९००२५३२ | **यादीतील सर्व परीक्षार्थी** |

नमुना क्र. १

**भाषा संचालनालय**

**मराठी टंकलेखन/लघुलेखन परीक्षा**

**ओळखपत्र**

फोटो

श्री/कुमारी/श्रीमती.......................................................................हे/या सरकारी कर्मचारी असून, खाली दर्शविल्याप्रमाणे त्यांनी आपली सही माझ्या समक्ष केली आहे. भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या मराठी टंकलेखन/लघुलेखन परीक्षेसाठी त्यांचा आसन क्रमांक......................आहे

..........................

**परीक्षार्थ्यांची सही**

(उमेदवाराने आपल्या कार्यालय प्रमुखासमक्ष सही करावी)

दिनांक......................

..........................................................

(उमेदवाराच्या कार्यालयाचे नाव आणि कार्यालय प्रमुखाची सही)

..........................

**परीक्षार्थ्यांची सही**

(परीक्षा केंद्रावर पर्यवेक्षकाच्या समोर सही करावी)

दिनांक......................

..........................

पर्यवेक्षकाची सही

**महत्वाची सूचना:-** हे प्रमाणपत्र परीक्षेच्या काळात ज्या ज्या वेळी मागण्यात येईल त्या त्या वेळी दाखल केले पाहिजे

(शा.म.मु.) एच २२६० (५,०००-२-२००३)

## मराठी लघुलेखन परीक्षा - (८० श.प्र.मि.गती)

## उमेदवारांना गुणांकन पध्दतीबाबतच्या सूचना :-

१. परीक्षेकरता (अ) व (ब) असे दोन उतारे असतील. प्रत्येक उतारा स्वतंत्रपणे तपासण्यात येईल. एकूण १०० गुणांपैकी प्रत्येक उताऱ्यासाठी ४५ गुण आहेत. शुध्दलेखनाकरिता य योग्य तो समास सोडणे, परिच्छेद पाडणे, विरामचिन्हे देणे. नीटनेटकेपणा इत्यादीकरिता प्रत्येक उताऱ्यासाठी ५ गुण ठेवले आहेत.

२. परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी एकूण ५० गुण आवश्यक आहेत . त्यासाठी दोन्ही उताऱ्याचे एकित्रत गुण विचारात घेतले जातील. मात्र कोणत्याही एका उताऱ्यात कितान १५ गुण मिळवणे आवश्यक आहे. उताऱ्यामध्ये ७५ पेक्षा जास्त चुका झाल्यास उतारा पुढे तपासण्यात येणार नाही. प्रत्येक दोन चुकांसाठी एक गुण कमी करण्यात येईल. अशाप्रकारे मिळालेल गुण म्हणजे त्या उमेदवारास मिळालेले एकूण गुण होतील.

३. उताऱ्यातील एखाद्या शब्दाकरिता दुसराच चुकीचा शब्द लिहिल्यास अगर एखादा शब्द गाळल्यास अशा प्रत्येक चुकीच्या अथवा गाळलेल्या शब्दाकरिता एक चूक धरण्यात येईल. उताऱ्यातील शब्द मोजताना मूळ शब्दाला जोडून येणारे विभक्ति, प्रत्यय व अव्यये वेगळी मोजण्यात येतात. म्हणून चुका मोजताना एखाद्या विशिष्ट चुकीच्या अध्वा गाळलेल्या शब्दाच्या बाबतीतील वरीलप्रमाणे जितके शब्द मोजले असतील तितक्या चुका मोजण्यात येतील. उदाहरणार्थ , परीक्षेच्या उताऱ्यातील शब्द मोजताना "घरात" , "घरुन", "घरातून" अशासारखे शब्द एकत्र छापण्यींत येत असले तरी, लघुलेखन परीक्षेत ते दोन शब्द मोजण्यात येतात. याच पध्दतीने "घरातूनही" हे तीन शब्द मोजण्यात येतात. तसेच, सामासिक शब्दाच्या बाबतीत त्याची फोड केल्यानंतर त्यात जितके मूळ शब्द निघतील तितके शब्द मोजण्यात येतात. उदाहरणार्थ, "घरदार", "सभागृह" अशासारखे शब्द दोन-दोन मोजण्यात येतात. तर "तुरुंगाधिकाऱ्यालासुध्दा" यासारख्या शब्दाकरिता चार शब्द मोजण्यात येतात. म्हणून वरीलसारखे शब्द गाळले गेले असतील अथवा त्यांच्याऐवजी चुकीचे शब्द घातले गेले असतील तर अशा प्रत्येक शब्दासाठी फक्त एकच चूक न धरता त्याकरिता परीक्षेच्या उताऱ्या जितके शब्द मोजले गेले असतील तितक्या चुका मोजण्यात येतील. म्हणजे "घरात","घरुन","घरातून","घरदार","सभागृह" अशासारख्या शब्दांकरिता प्रत्येकी दोन चुका, "घरातूनही", सारख्या शब्दाकरिता तीन चुका व "तुरुंगाधिकाऱ्याला सुध्दा" शब्दाकरिता चार चुका मोजण्यात येतील.

४. सांगितलेल्या एका वाक्यातील एक अथवा अनेक शब्द गाळून त्याऐवजी चुकीचे अतिरिक्त शब्द घालण्यात आले असतील तर जे शब्द गाळले गेले असतीलल त्यांच्यासाठी प्रत्येकी एक चूक धरुन शिवाय त्या वाक्यात समाविष्ट केलेल्या सर्व अतिरिक्त शब्दांकरिता मिळून आणखी एक चूक धरण्यात येते. प्रत्येक नवीन वाक्याचा संदर्भात हीच पध्दती अंमलात आणण्यात येते.

५. एखाद्या शब्दाच्या चुकीच्या लेखनामुळे अर्थात बदल होत असेल तर ती चूक धरण्यात येईल. उदा. "कारवाई", ऐवजी "कार्यवाही", "सुत" ऐवजी "सूत", "आव्हान" ऐवजी "आवाहन", "सुर" ऐवजी "सर" किंवा उलट.

६. शुध्दलेखन महाराष्ट्र शासनाने मान्य केलेल्या शुध्दलेखनाच्या नियमानुसार तपासण्यात येईल.

७. उमेदवाराने श्रुतलेखन लघुलिपितच घेणे आवश्यक आहे. देवनागरी मध्ये श्रुतलेखन घेतल्यास संबंधित उमेदवाराची उत्तरपत्रिका तपासली जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

(वरील सूचना एतदर्थ मंडळाच्या दि.१६.७.१९८७ व दि.१२.२.१९९८ च्या बैठकीतील, निर्णयानुसार तयार केलेल्या आहेत.)

### परीक्षार्थ्यांना महत्वाची सूचना

१. "उमेदवाराने श्रुतलेखन लघुलिपित घेणे बंधनकारक आहे तसे न केल्यास त्यास अनुत्तीर्ण घोषित करण्यात येईल."

२. परीक्षा दालनात लिप्यंतरासाठी कागद पुरविले जातील. तसेच रबर, खाजगी कागद अगर इतर तत्सम कोणत्याही वस्तूचा वापर करण्यास सक्त प्रतिबंध करण्यात येत आहे.

## भाषा संचालनालय लघुलेखन परीक्षा ऑक्टोबर, २०२५
### (परीक्षार्थींची यादी)

**केंद्र: मुंबई** **परीक्षेचा दिनांक: १७ ऑक्टोबर,२०२५**

| आसन क्रमांक | परीक्षार्थीचे नाव (आडनाव प्रथम) | कार्यालय प्रमुखाचे पदनाम व पत्ता | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. चाबुकस्वार संतोष सुभाष | प्रबंधक,<br>लघुवाद न्यायालय, एल.टी.रोड,<br>धोबी तलाव, मुंबई-४००००२. | |
| २ | श्री. कांबळे दयानंद बसवंत | --//-- | |
| ३ | श्रीमती टंगसाळी साधना शंकर | --//-- | |
| ४ | श्री. आंबवकर अनघा अशोक | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे,<br>प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर,वर्कोल श्री. प्रभाकर हेगडे मार्ग,<br>कोर्ट नाका, ठाणे (पश्चिम)-४००६०१. | |
| ५ | श्रीमती कुलकर्णी शुभदा सुनिलराव | --//-- | |
| ६ | श्री. पाटील शांताराम किरणकुमार | --//-- | |